ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 9 | June - 2016
Review Of Research

# राष्ट्रकूट कालीन वास्तुकला

प्रा. रेवणसिध्द रामभाऊ बेरुनगीकर
दयानंद कला व शास्त्र महाविदयालय , सोला□ूर .




**सारांश**

राष्ट्रकूट व □ाल या तिघांचा कनौजवरील नियंत्रणासाठीचा संघर्ष, तर दक्षिणेत चोल साम्राज्याचा उदय असे काहीसे चित्र दिसते. या कालखंडातील संस्कृतीमध्ये प्रतिहारांच्या दरबारातील नराजशेखरचे साहित्य, □ालांनी भरभराटीस आणलेले नालंदा विद्या□ीठ व नव्याने स्था□न केलेले विक्रमशिला विद्या□ीठ, राष्ट्रकुटांच्या राजाश्रयाखालील संस्कृत, प्राकृत, अ□भ्रंश व कन्नड साहित्य, वेरुळ येथील राष्ट्रकुटांची प्रसिद्ध मंदिरं यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त राज□ूत, □ाल, चालुक्य, प्रतिहार वास्तुकला, चोल मंदिरं, सोलंकी कला, चोलांची धातूमधील शिल्□कला (नटराज), चोल चित्रकला यांचाही अंतर्भाव होतो.


**राष्ट्रकुट:**

१). राष्ट्रकुट सत्ता आठव्या शतकामध्ये दक्षिण भारतात उदयास आली.

२).तिसरा गोविंद या राजाने ती कनोजा□ासून रामेश्वर□र्यंत वाढवली.

३).त्याचा मुलगा अमोघवर्ष याने सोला□ूर जवळ मालखेडमध्ये सत्ता स्था□न केली. चोळांची सत्ता जिंकून घेतली आणि अलाहाबादसह उत्तर भारतात वाढवली.

४). या सत्तेचा शेवट दहाव्या शतकात झाला.




**विशेष:**

१). राष्ट्रकुट राजांना कार्यक्षम प्रशासक म्हणून प्रसिद्धी मिळाली.त्यांच्या कराकीर्दीत व्या□ार व उद्योगधंदे यांची वाढ झाली.

२).जगप्रसिध्दी वेरूळची लेणी, कैलास मंदिर तसेच कन्याकुमारीचे मंदिर यांची उभारणी करण्यात आली.

भारताच्या दुस-या साम्राज्याचा म्हणजेच गुप्त साम्राज्याचा कालखंड हा भारताच्या प्राचीन इतिहासाच्या उत्क्रांतीच्या शृंखलेतील महत्त्वाचा दुवा ठरतो. हा कालखंड ठरतो तो सांस्कृतिक उत्क्रांतीच्या उच्चतम पातळीचा. तद्वतच हा कालखंड ठरतो एका मुख्य सामाजिक मन्वंतराचा. वाढत्या सामंतशाहीचा समाजावरील प्रभाव गुप्तोत्तर कालखंडातील प्राचीन कालखंडाच्या अस्तास व मध्ययुगीन कालखंडाच्या उगमास कारणीभूत ठरतो.

गुप्त साम्राज्याच्या कालखंडाला काही इतिहासकार 'सुवर्णयुग' असे म्हणतात, तर काही इतिहासकार 'सुवर्णयुगाची दंतकथा' म्हणून त्यावर टीका करतात. या वादावर भाष्य करण्यापेक्षा गुप्त कालखंडातील समृद्ध संस्कृतीचा अभ्यास करणे अधिक श्रेयस्कर ठरते. अर्थात या समृद्ध सांस्कृतिक अभिव्यक्तीला मौर्यांच्या काळात घातल्या गेलेल्या पायाची व मौर्योत्तर काळातील व्यापारी समृद्धीची पाश्र्वभूमी लाभली होती यात शंका नाही. या काळात शिक्षण, साहित्य, गणित, खगोलशास्त्र, धातूशास्त्र, वैद्यकशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत कमालीची सर्वांगीण प्रगती झाली. शिक्षणामध्ये नालंदा विद्यापीठ; गणित व खगोलशास्त्रामध्ये वराहमिहीर, ब्रह्मगुप्त व त्याहीपेक्षा महत्त्वाचे, वैशिष्ट्यपूर्ण असे आर्यभट्टाचे योगदान; साहित्यामध्ये जगप्रसिद्ध कालिदास, विशाखादत्त, भारवी, कुमारदास, भट्टी, अमरू, वज्जीका, शुद्रक, सु□ंधू, हर्षवर्धन व □ाणभट्ट (गुप्तोत्तर काळ), भवभूती यांचे योगदान; संस्कृत व्याकरणामध्ये भरत्रीहरी, अमरसिंह, चंद्रगोमिया यांचे कार्य; वरारूची, चंद यांचे प्राकृत व पाली व्याकरणातील कार्य; धार्मिक साहित्यामध्ये पुराण, महाभारत, रामायण, □ौद्ध साहित्य, जैन साहित्य या सर्वांचा समावेश या काळातील समृद्ध संस्कृतीमध्ये होतो. याव्यतिरिक्त वास्तुकलेतील नगर व द्रविड कलांचा उदय, शिल्पकला व चित्रकलेचाही यात अंतर्भाव होतो. गुप्तोत्तर काळातील वैभवशाली राजा हर्षवर्धनाचा मृत्यू (647A.D.) प्राचीन इतिहासाचा अस्त दर्शवतो.

भारताच्या सांस्कृतिक जडणघडणीतून भारतीय ऐतिहासिक कालखंडाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर स्थापन झालेल्या नक्षशिला व नालंदा महाविहारांवरील तुलनात्मक प्रश्नाचे (मुख्य परीक्षा, २०१४) उत्तर 'भारताच्या सांस्कृतिक प्रवासाची/ उत्क्रांतीची' समज असल्याशिवाय लिहिता येत नाही.

गुर्जर-प्रतिहारांच्या ऱ्हासानंतर  उत्तर-पश्चिम भारतावर मुस्लीम आक्रमणं होताना दिसतात. महमूद गझनी व मोहम्मद घुरी यांच्या एकानंतर एक स्वाऱ्या व तद्नंतर दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना असा घटनाक्रम आहे. सुलतानशाही व मुघल काळात खूप मोठ्या प्रमाणावर इतिहासलेखन झाले. मिन्हास-उस-सिराज, झिया-उद्-दीन □रानीपासून अ□ुल फझल, मुहम्मद हाशिम खाफी खानपर्यंत ही एक मोठी साखळीच आहे. गझनी, घुरीपासून औरंगजे□ व त्यानंतरच्या □ादशहांच्या अनेक घटनांवर व वेगवेगळ्या अंगांवर या इतिहासलेखनाने प्रकाश टाकला आहे. त्याच□रो□र जॉन फ्रेअर, फ्रँकाइस □र्नियर, निकोलो मॅनुसी यांसारख्या परकीय प्रवाशांच्या पुस्तकांचाही यात समावेश करता येईल. याव्यतिरिक्त संस्कृत पुस्तकांचे पर्शियन भाषांतर, अमीर खुस्रोचे काव्य यांचा साहित्यामध्ये समावेश होतो. वास्तुकलेमध्ये इस्लामिक व भारतीय वैशिष्ट्यांचा मिलाफ दिसून येतो. ताजमहल ही सुलतानशाहीपासूनच्या वास्तुकलेच्या उत्क्रांतीची व या उत्क्रांतीची इतर भारतीय वैशिष्ट्यांशी मिलाफ घडवणारी सर्वोच्च प्रतीची अभिव्यक्ती म्हणता येईल. तसेच विजयनगर या समृद्ध राज्यामध्ये विशिष्ट वास्तुकलेची निर्मिती झालेली होती. या काळात संगीत, चित्रकला (मुघल चित्रकला), विणकाम यांमध्ये मोठी प्रगती झाली. भारतीय समाजावर दूरगामी परिणाम करणाऱ्या सुफी व भक्ती चळवळीचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो.

२०१४च्या मुख्य परीक्षेमधील सुफी व इतर मध्ययुगीन संतांच्या कार्याचा हिंदू/ मुस्लीम समाजाच्या □ाह्य संरचनेवरील परिणामांवर उत्तरामध्ये भाष्य करण्याची अपेक्षा ठेवणारा प्रश्न 'संस्कृती व सामाजिक संरचना' यांच्या परस्परसं□ंधाचा वेध घेणारा ठरतो.

आधुनिक कालखंडातील वास्तुकला, संगीत, नृत्य, चित्रपट, रंगमंच व कलेला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. युरोपियन लोकांच्या आगमनानंतर कलेच्या अनेक क्षेत्रांत युरोपियन वैशिष्ट्ये आढळतात. वास्तववादी छायांकन (Realistic Shading), परिप्रेक्ष्य (Perspective), त्रिमितीय (Three-Dimensional) चित्रीकरण या युरोपियन वैशिष्ट्यांनी मुघल चित्रकलेला समृद्ध केले. भारताच्या वसाहतवादी कालखंडातील वास्तुकलेवर युरोपियन प्रभाव स्पष्ट जाणवतो. त्यामध्ये गॉथिक, रोमन, ब्रिटिश, पोर्तुगीज वैशिष्ट्ये आढळतात. भारतीय संगीताची मुळे सामवेदामध्ये असून

भारताच्या नाटय़शास्त्र या साहित्य कलाकृतीमध्ये त्याचा अभ्यास दिसून येतो. कदाचित मध्ययुगीन काळातील उत्तर भारतीय संगीतावरील पांशयन प्रभावामुळे उत्तर व दक्षिण भारतातील संगीतामधील भेद स्पष्ट होण्यास सुरुवात होते. त्यातूनहिंदुस्तानी व कर्नाटकी भारतीय संगीतातील दोन मुख्य प्रवाह विकसित होतात. या दोन संगीत प्रकारातील फरक, मूलभूत तांत्रिक संकल्पना व महत्त्वाचे घराणे यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. भरताच्या नाटय़शास्त्रामध्ये नृत्यविषयक सखोल समीक्षा आहे. भारतीय अभिजात नृत्य (भरतनाटय़म, कथकली, मोहिनीअट्टम, ओडिसी, कथक, कुचीपुडी, मणिपुरी, सत्तरीय), त्यांची मुख्य वैशिष्टय़े व घराणे यांचा अभ्यास आवश्यक आहे. आधुनिक काळातील महत्त्वाचे चित्रकार, संगीतकार, नृत्य कलाकार, भारतीय चित्रपट व रंगमंचाचा विकास, विविध कलांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्था यांचा एक ढोबळ आढावा लाभदायक ठरू शकतो.

भारतीय इतिहासाची रूपरेखा स्पष्ट करणा-या मूलभूत क्रमिक पुस्तकांच्या आकलनानंतर भारतीय संस्कृतीवरील एखाद्या प्रमाणित संदर्भग्रंथाचे वाचन पुरेसे ठरावे.

गुर्जर-प्रतिहारांच्या ऱ्हासानंतर उत्तर-पश्चिम भारतावर मुस्लीम आक्रमणं होताना दिसतात. महमूद गझनी व मोहम्मद घुरी यांच्या एकानंतर एक स्वाऱ्या व तद्नंतर दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना असा घटनाक्रम आहे. सुलतानशाही व मुघल काळात खूप मोठय़ा प्रमाणावर इतिहासलेखन झाले. मिन्हास-उस-सिराज, झिया-उद्-दीन बरानीपासून अबूल फझल, मुहम्मद हाशिम खाफी खानपर्यंत ही एक मोठी साखळीच आहे. गझनी, घुरीपासून औरंगजेब व त्यानंतरच्या बादशहांच्या अनेक घटनांवर व वेगवेगळ्या अंगांवर या इतिहासलेखनाने प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर जॉन फ्रेअर, फ्रँकाइस बांनयर, निकोलो मॅनुसी यांसारख्या परकीय प्रवाशांच्या पुस्तकांचाही यात समावेश करता येईल. याव्यतिरिक्त संस्कृत पुस्तकांचे पांशयन भाषांतर, अमिर खुस्रोचे काव्य यांचा साहित्यामध्ये समावेश होतो. वास्तुकलेमध्ये इस्लामिक व भारतीय वैशिष्टय़ांचा मिलाफ दिसून येतो. ताजमहल ही सुलतानशाहीपासूनच्या वास्तुकलेच्या उत्क्रांतीची सर्वोच्च प्रतीची अभिव्यक्ती म्हणता येईल. तसेच विजयनगर या समृद्ध राज्यामध्ये विशिष्ट वास्तुकलेची निर्मिती झालेली होती. या काळात संगीत, चित्रकला (मुघल चित्रकला), विणकाम यांमध्ये मोठी प्रगती झाली. भारतीय समाजावर दूरगामी परिणाम करणाऱ्या सूफी व भक्ती चळवळीचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो.

आधुनिक कालखंडातील वास्तुकला, संगीत, नृत्य, चित्रपट, रंगमंच व कलेला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. युरोपियन लोकांच्या आगमनानंतर कलेच्या अनेक क्षेत्रांत युरोपियन वैशिष्टय़े आढळतात. वास्तववादी छायांकन (Realistic Shading), परिप्रेक्ष्य (Perspective), त्रिमितीय (Three-Dimensional) चित्रीकरण या युरोपियन वैशिष्टय़ांनी मुघल चित्रकलेला समृद्ध केले. भारताच्या वसाहतवादी कालखंडातील वास्तुकलेवर युरोपियन प्रभाव स्पष्ट जाणवतो. त्यामध्ये गॉथिक, रोमन, ब्रिटिश, पोर्तुगीज वैशिष्टय़े आढळतात. भारतीय संगीताची मुळे सामवेदामध्ये असून भरताच्या नाटय़शास्त्र या साहित्य कलाकृतीमध्ये त्याचा अभ्यास दिसून येतो. कदाचित मध्ययुगीन काळातील उत्तर भारतीय संगीतावरील पांशयन प्रभावामुळे उत्तर व दक्षिण भारतातील संगीतामधील भेद स्पष्ट होण्यास सुरुवात होते. त्यातून हिंदुस्तानी व कर्नाटकी भारतीय संगीतातील दोन मुख्य प्रवाह विकसित होतात. या दोन संगीत प्रकारांतील फरक, मूलभूत तांत्रिक संकल्पना व महत्त्वाचे घराणे यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. भरताच्या नाटय़शास्त्रामध्ये नृत्यविषयक सखोल समीक्षा आहे. भारतीय अभिजात नृत्य (भरतनाटय़म, कथकली, मोहिनीअट्टम, ओडीसी, कथ्थक, कुचीपुडी, मणीपुरी, सत्तरीय), त्यांची मुख्य वैशिष्टय़े व घराणे यांचा अभ्यास आवश्यक आहे. आधुनिक काळातील महत्त्वाचे चित्रकार, संगीतकार, नृत्य कलाकार, भारतीय चित्रपट व रंगमंचाचा विकास, विविध कलांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्था यांचा एक ढोबळ आढावा फायद्याचा ठरू शकतो.

भारतीय संस्कृतीवरील या लेखांमधील विश्लेषण या घटकाची व्याप्ती स्पष्ट करणारा जलद आढावा ठरतो. भारतीय इतिहासाची रूपरेखा स्पष्ट करणाऱ्या मूलभूत क्रमिक पुस्तकांच्या आकलनानंतर भारतीय संस्कृतीवरील एखाद्या प्रमाणित संदर्भग्रंथाचे वाचन पुरेसे ठरावे. मूलभूत क्रमिक पुस्तकांच्या माध्यमातून केलेला सामाजिक, आांथक, राजकीय अंगाचा 'आवश्यक किमान' अभ्यास या संपूर्ण प्रक्रियेला पूर्णत्व प्राप्त करून देणारा ठरतो.



पाल सत्तेच्या काळातील कला व वास्तुशिल्प

वेरूळच्या लेणीसमूहात १६ वैदिक हिंदू, १३ बौद्ध, तर ५ जैन लेणी आढळतात. तीन धर्माचे अधिष्ठान असलेल्या शिल्पाकृती एकाच ठिकाणी येथे पाहावयास मिळतात. त्यातून धर्माभिमानाचा अट्टहास दिसत नसून, परधर्मसहिष्णुतेचे अनोखे दर्शनच घडते..

भारतभूमीवर सुमारे बाराशे लेणी आहेत. त्यातील जवळजवळ ८०० लेणी महाराष्ट्रात निर्माण झाल्यात. स्थापत्य शिल्पकलेचा हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या या विविध लेण्यांना इतिहासाबरोबर काही राजसत्तेच्या प्रोत्साहनाबरोबर धर्माचीही पाश्र्वभूमी आहे. युनेस्कोने जाहीर केलेल्या जागतिक वारसा यादीत भारतातील ज्या मानवनिर्मित वारसावास्तू, शिल्पांचा समावेश झालाय त्यातील औरंगाबादजवळील वेरूळ येथील लेणी-समूह म्हणजे पृथ्वीवर अवतरलेला जणू स्वर्गच!

औरंगाबादपासून २८ कि.मी. अंतरावर हा शिल्प-खजिना आहे. देशातील बहुतेक लेण्यांचे खोदकाम पहाडांच्या मध्यभागी झालेले आढळते. मात्र वेरूळचा लेणी समूह सलग प्रस्तरातून निर्माण झाला आहे. इतकेच नव्हे तर या लेण्यांचे खोदकाम 'आधी कळस, मग पाया' या वचनानुसार पहाडाच्या शिखरापासून प्रारंभ करून पायथ्यापर्यंत येत हे अलौकिक शिल्प साकारण्यातील शिल्पकारांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. लेण्यांचे खोदकाम हाती घेण्याआधी त्या अज्ञात शिल्पकारांनी नियोजित जागेचा निश्चितच अभ्यास करून आराखडा तयार केल्याचे जाणवते. लेणी खोदकामातील भूमितीशास्त्राबरोबर भूगर्भशास्त्र, पहाडी प्रदेशातील पत्थराच्या दर्जाचा अभ्यास करून येथे कामाला प्रारंभ झाला. संपूर्ण लेणी-समूहातून हवा-प्रकाशाबरोबर पर्यावरणाचाही अभ्यास या शिल्पकारांनी करून आम्ही किती प्रगत, अभ्यासू आहोत हेच जगाला दाखवून दिले आहे.

यापूर्वी- आधी निर्माण केलेल्या लेणी उभारणीचा अनुभव ध्यानी घेऊन खोदाईचे तंत्र कालांतराने विकसित झाल्याचे दिसते. या लेण्यांमध्ये दुर्मीळ असलेल्या इमारतीप्रमाणे मजल्याचे काम हाती घेण्यात आले हे विशेष. त्यासाठी जिने, गच्ची, सज्जे अशा प्रकारचेही पूरक बांधकाम करण्यात आले आहे. अजिंठा लेण्यांचे काम पूर्ण झाल्यावर इ.स. ५व्या शतकात ही अजरामर शिल्पकला निर्माण झाली. या लेणी समूहात १६ हिंदू, १३ बौद्ध, तर पाच जैन धर्मीय लेण्या आढळतात. तीन धर्माचे अधिष्ठान असलेल्या शिल्पाकृती एकाच ठिकाणी येथे पाहावयास मिळतात. त्यातून धर्माभिमानाचा अट्टहास दिसत नसून, परधर्म सहिष्णुतेचे येथे अनोखे दर्शनच घडते. जैन, बौद्ध, हिंदू धर्मीयांनी ही उत्कृष्ट कलाकृती निर्माण करताना आपापसांतील मतभेद बाजूला ठेवून सहिष्णुता, सलोखा आणि एकात्मतेचे अनोखे दर्शनच घडवले आहे. वेगवेगळ्या संस्कृतींचा असा मिलाफ क्वचितच कुठे पाहावयास मिळतो.

या लेण्यांतील कैलास मंदिर लेणे म्हणजे एकसंध खडकातून निर्माण केलेले अवर्णनीय असे नुसतेच काव्य नव्हे, तर ते अजरामर महाकाव्य आहे. २९ मी. उंच ५० मी. लांब आणि ३३ मी. रुंद असे त्याचे आकारमान आहे. शिवाचे निवासस्थान (सदन शिवाचे) म्हणून या लेण्याला कैलास लेणे असे म्हटले जाते. हजारो वर्षांपूर्वी हाती फक्त छिन्नी-हातोडा घेऊन अज्ञात कलाकारांनी हे शिल्प निर्माण करून आमच्या संस्कृतीचा ध्वज जगभर फडकवत ठेवलाय. ज्या पहाडात ही लेणी निर्माण झाली, त्याला 'येलू' पर्वत असे म्हणतात. त्याच्याजवळून 'येलगंगा नावाची नदी वाहते' येलू पर्वत आणि येलगंगा यावरून या ठिकाणाला 'येलूर' हे नाव पडून कालांतराने त्याचे 'वेरूळ' हे नाव रूढ झाले.

कैलास लेण्यांच्या प्रवेशद्वारी दोन्ही बाजूंस सुबक शिल्पे आहेत. त्यांना पौराणिक पाश्र्वभूमी आहे. त्यातील शंखनिधी आणि पद्मनिधी हे द्वारपाल आपले लक्ष्य वेधतात. जोडीला महाकाय हत्ती आणि उंच ध्वजस्तंभ, कीर्तिस्तंभांनी या शिल्पाचे सौंदर्य खुलवले आहे. एकाच प्रस्तरातून निर्माण झालेले हे कैलास लेणे इ.स. ८ व्या शतकाच्या उत्तरार्धात राजा कृष्णराज याच्या औदार्य, प्रोत्साहनाने निर्माण झाले. त्याच्यानंतर सत्तेवरील राज्यकर्त्यांनीही प्रोत्साहन देण्याचे धोरण कायम ठेवले. रामायण-महाभारतातील प्रमुख प्रसंग या लेण्यांत अप्रतिमपणे कोरले गेल्याने या दोन्ही काळांतील सचित्र

इतिहासाचे सादरीकरण करण्यात शिल्पकारांनी आपली जान ओतली आहे. त्यातील महाभारत कथासार, श्रीकृष्ण जन्म, महाभारत युद्ध, भरताचे राज्यारोहण, राम-हनुमान भेट हे प्रमुख प्रसंग खूपच सजीव-बोलके वाटतात.

कैलास लेणी प्रारंभी 'माणिकेश्वर' नावाने परिचित होती. इतिहासकार- जाणकारांच्या म्हणण्यानुसार शिल्पकारांनी नियोजित खोदकामाचा आराखडा तयार केल्यावर सोयीचा मोठा खडक मूळ डोंगरापासून अलग करून घेतला. नंतर शिखरापासून खोदकामाला सुरुवात करण्यात आली. त्या काळच्या प्रचलित पद्धतीनुसार ही लेणी म्हणजे मंदिर बांधकाम नव्हे, तर कल्पकतेने कोरीव कामातून साकारल्याने ते शिल्पच आहे. येथील मोठ्या संख्येने (१६) निर्माण केलेल्या हिंदू लेण्यांवर पौराणिक प्रसंगांवर भर देण्यात शिल्पकारांनी आपले कौशल्य पणाला लावले आहे. देशभर हिंदूंच्या पुनरुज्जीवनाच्या काळी भव्य शिल्प मंदिरे उभी राहत असतानाच वेरूळची ही भव्य लेणी शिल्पाकृती निर्माण झाली, ही विशेष बाब आहे. शतकापेक्षा जास्त काळ परिश्रम घेऊन एकसंध प्रस्तरातून कल्पकतेने विशाल देखणी लेणी निर्माण करणे हा खरे तर वास्तुशास्त्रामधील अजब प्रकार येथे पाहावयास मिळतो. या लेण्यांवर द्रविडी शैलीचा प्रभाव जाणवतो. १४ क्रमांकाच्या भव्य लेण्यांतील विस्तीर्ण मंडपाच्या केंद्रस्थानातून उभारलेल्या बारा स्तंभांमुळे या लेण्याचे वेगवेगळे चौरस-चौकटीसदृश भाग दिसून येतात. प्रत्येक भागातील लहान-मोठ्या शिल्पाकृती पौराणिक कथेचे सादरीकरण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. दुर्गामूर्ती, गजलक्ष्मी, जलाभिषेक करणारे गजराज यांच्या बरोबरीने पाना-फुलांचा जो निसर्ग आविष्कार दाखवलाय तो सर्वच सजीव आणि बोलका वाटतो.

वेरूळ लेण्यांतील बौद्ध लेण्या दक्षिणाभिमुख आहेत. बऱ्याच लेण्यांतून कलात्मकतेबरोबर भव्यतेचा आविष्कार जाणवतो. औरंगाबादनजीकच्या अजिंठा लेण्यांतील भित्तीचित्रांचे वैशिष्ट्य येथे जाणवत नाही. गौतमबुद्ध आणि बुद्ध धर्मीय देवतांना या लेण्यांतून महत्त्व देण्यात आल्याचे जाणवते. बुद्धाच्या विविध शैलीतील लहान-मोठ्या मूर्ती कोरण्यावर आपले लक्ष केंद्रित केल्याचे जाणवते. या बौद्ध लेण्यांतील क्र. १० चे लेणे म्हणजे कल्पकता, कला आणि प्रगत वास्तुशास्त्राबरोबर नव्या-जुन्यांचा सुनहरा संगम आहे. क्र. ११-१२ लेण्यांना भव्यता आहे. हे लेणे सुरुवातीस दोन मजलीच होते, परंतु तळमजल्यावर उत्खनन केल्यावर ते मूळचे तीन मजली असल्याचे निष्पन्न झाले. बौद्ध लेण्यांतून सर्वत्र विविधता आणि कलात्मकतेचेही दर्शन घडते. बुद्धाच्या विविध मूर्तीव्यतिरिक्त मानवी जीवनाला आधार ठरलेले पशु-पक्षी यांच्याबरोबर वनसंपदा दाखवण्यापाठीमागे त्या काळचे वृक्षसंवर्धनाचे महत्त्व सांगण्याचाच जणू प्रयास आहे.

### जैन लेणी समूह

संख्येने कमी असलेली एकूण पाच (क्र. ३० ते ३४ ही जैन धर्मीयांची गुहा-मंदिरे येथे आहेत. त्यात इंद्रसभा, छोटा कैलास आणि जगन्नाथ सभा पाहावयास मिळतात. त्या काळी निर्माण झालेल्या बौद्ध-हिंदू लेणी शिल्पकलेचा जैन लेण्यांवर प्रभाव जाणवतो. या लेण्यांतील छोटा कैलास शिल्पाकृती म्हणजे हिंदू कैलासाची छोटी प्रतिकृतीच वाटते. या लेण्या एक मजलीच असून त्याची आतून जोडणी करण्यात आली आहे. विशाल आकाराचा हत्ती आणि कलापूर्ण स्तंभासह सूक्ष्म कलाकुसर, आकर्षक तोरणे हे जैनांचे वैभव साक्षीदार ठरलेत.. २३ वे तीर्थकार पाश्र्वनाथांची विशाल मूर्ती हे येथील वैशिष्ट्य आहे. याशिवाय इंद्र, गोमटेश्वर यांची शिल्पेही येथे पाहावयास मिळतात.

वेरूळ लेण्यांतील शिल्पमूर्तीचे बोलके, सजीव चेहरे, त्यांची कमनीय, सुडौल शरीररचना, वस्त्र-आभूषणांसहित स्त्री-पुरुष मूर्तीचा साज-शृंगार, स्त्री शिल्पांची आकर्षक वेशभूषा-केशरचना, पशु-पक्षी आणि वृक्षसंपदेचे सहजसुंदर सादरीकरण हे सारे पाहाताना त्या काळच्या कलासक्त, सुसंस्कृत समाजजीवनाची कल्पना येते.

कितीही वेळा वेरूळ बघून झाले तरी आपले मन भरत नाही. पण येथील देवदुर्लभ, अनोख्या दर्शनाने कोणताही दर्शक-अभ्यासक हेलावतो आणि अंतर्मुखही होतोच. हा सारा दुर्मीळ नजारा बघून बाहेर पडताना पाय जडावतात आणि काही प्रश्न तुमचा पाठपुरावा करतात.



### अजिंठा-वेरूळची लेणी

भारताच्या महाराष्ट्र राज्यातील प्राचीन अजिंठा-वेरूळची लेणी ही वाकाटक, चालुक्य आणि राष्ट्रकूट काळात निर्मिली केली. ही लेणी त्यांच्यातील स्थापत्यकला, शिल्पकला व चित्रकलेसाठी जगप्रसिद्ध आहेत.

## इतिहास

प्राचीन भारतात धर्मशाळा, लेणी क्वचित मंदिरेसुद्धा मुख्यत्वे व्यापारी मार्गांवर विश्रांतीसाठी उभारण्यात येत असत. त्यांचा उद्देश वाटसरूंना सुरक्षित आश्रय स्थान मिळावे असा असे. त्यांना राजाश्रय, धर्माश्रय व लोकाश्रय असे. अजिंठा गावाजवळची लेण्यांची निर्मितीही याच उद्देशातून सुरू झाली असावी. कालांतराने तिचे रूपांतर एका नितांतसुंदर अशा चित्रकला व शिल्पकला दालनांत झाले. मात्र या लेण्यांची मूळ रचना एखाद्या धार्मिक शिक्षणसंस्थेसारखी आहे.

पुरातत्त्वशास्त्रीय पुराव्यानुसार ही लेणी दोन वेगवेगळ्या कालखंडात निर्माण केली गेली. ९, १०, १२, १३ व १५-अ ही लेणी हीनयान कालखंडात कोरली गेली असावीत. हा कालखंड साधारणतः इ.स.पूर्वीच्या दुसऱ्या शतकाच्या सुमारास सुरू झाला. या सगळ्या लेण्यांतून बुद्धाचे दर्शन स्तूप-रूपांत होते. ही सोडून १ ते २९ क्रमांकांची लेणी साधारणतः ८००-९०० वर्षांनंतर (इ.स.च्या सहाव्या व सातव्या शतकाच्या आसपास) महायान कालखंडात निर्माण केली गेलेली असावीत. या लेण्यांतून बुद्धाचे सर्वसामान्य लोकांस परिचित असे रूप दिसून येते. महायान लेणी वाकाटक राजांचा राजवटीत निर्मिली गेली, त्यामुळे त्यांस एकेकाळी वाकाटक लेणी असेही संबोधले जाई.

वाकाटक साम्राज्याच्या ऱ्हासानंतर यांची निर्मिती अचानक थांबली व ही लेणी नियोजित भव्यतेपासून वंचितच राहिली

## रचना

अजिंठा येथे एकूण २९ लेणी आहेत. ही सर्व लेणी वाघूर नदीच्या आसपास विखुरलेली आहेत. ही लेणी नदीच्या पात्रापासून १५-३० मीटर (४०-१०० फूट) उंचीवर कातळात आहेत. हीनयान कालखंडातील लेण्यांपैकी ९ व १० क्रमांकाची लेणी ही चैत्यगृह।चैत्यगृहे आहेत व १२, १३ ही लेणी आणि १५-अ क्रमांकाचे लेणे विहार आहे. महायान कालखंडातील लेण्यांपैकी १९, २६ व २९ क्रमांकाची लेणी चैत्यगृहे असून १, २, ३, ५, ६, ७, ८, ११, १४, १५, १६, १७, १८, २०, २१, २२, २३, २४, २५, २७ व २८ क्रमांकाची लेणी विहार आहेत.

विहार साधारणपणे चौरस आकाराचे असून त्यांची लांबी-रुंदी १७ मीटर (५२ फूट) पर्यंत आहे. हे विहार मुख्यत्वे भिक्षूंना राहण्यासाठी होते तर चैत्यगृहे हे पारंपरिक पूजाअर्चेसाठी वापरण्यात येत. कालांतराने विहारांतही मूर्तींची स्थापना झाली. बऱ्याच विहारांना सोपा व आंगण करण्यात आले व तेथे दगडात कलाकुसर व चित्रे काढण्यात आली.

## वेरूळ

महाराष्ट्रातल्या मराठवाडा भागात औरंगाबाद शहरापासून ३० किलोमीटर अंतरावर वेरूळ हे एक छोटे खेडेगांव आहे. येथे प्राचीन काळात कोरलेली १२ बौद्ध, १७ हिंदू आणि ५ जैन अशी एकूण ३४ लेणी आहेत. शिवाजी महाराजांचे भोसले घराण्याचे मूळ गाव वेरूळ आहे. वेरूळची लेणी साधारणत: इ.स.च्या पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरण्यात आली असून प्राचीन भारतातली बौद्ध, हिंदू आणि जैन धर्मांमधली परस्परसहिष्णुता प्रकर्षाने दाखवतात. वेरूळच्या लेण्यांची हिंदू लेणी, बौद्ध लेणी व जैन लेणी अशी विभागणी केली जाते.

महाराष्ट्रातील मराठवाडा भागात औरंगाबाद पासून ३० किमी अंतरावर वेरूळ हे एक गाव असून येथे प्राचीन लेणी आहेत. येथे १७ हिंदू, १२ बौद्ध आणि ५ जैन अशी एकूण ३४ लेणी आहेत. छत्रपती शिवाजी



महाराजांचे भोसले घराण्याचे मूळ गाव वेरूळ आहे. वेरूळची लेणी साधरणत: इसवी सनाच्या पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरली असून प्राचीन भारतातील हिंदू ,बौद्ध आणि जैन धर्मातील परस्परसंहिता प्रकर्षाने या लेण्यामध्ये दिसून येते.

वेरुळच्या लेण्यांची हिंदू लेणी, बौद्ध लेणी, आणि जैन लेणी अशी विभागणी केली आहे. हिंदू लेण्यामध्ये शिल्पकारांनी कातळात कोरलेली अतिप्रचंड शिल्पे आहेत. यातील बरीचशी लेणी वरपासून खालपर्यंत कोरीवकाम करीत निर्मिलेली आहेत. अशी लेणी कोरण्यासाठी कारागीरांच्या अनेक पिढ्या खर्ची पडल्याचा उल्लेख आहे. हिंदू लेण्यामधील वेरूळमधल्या १६ व्या लेण्यातले शिवमंदिर जगातील सर्वात मोठे कोरीव शिल्प असून या बहुमजली मंदिराची रचना कैलास पर्वताच्या धर्तीवर निर्मिलेली आहे. मंदिर निर्माण करायला अंदाजे दोन लाख टन वजनाचा एक अखंड खडक वापरण्यात असून तो उघडपणे वरून खाली म्हणजे कळसाकडून पायाकडे खोदून कोरण्यात आला असला पाहिजे. हे प्रचंड कोरीव काम पुरे करण्यासाठी अनेक दशके लागली असतील.

वेरूळची बौद्ध लेणी येथील सगळ्यात जुनी लेणी आहेत. ही लेणी विहार स्वरुपाची असून काही विहारात पूजेसाठी मूर्तीही आहेत. या सर्व लेण्यांमध्ये विश्वकर्मा लेणी प्रसिद्ध आहेत. हे अत्यंत सुबक व नाजूक कोरीव काम असून जणू दगडा ऐवजी लाकूड कोरले आहे असे वाटते. या स्तूपात भगवान गौतम बुद्धाची धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील मूर्ती आहे.

जैन लेणी हिंदू व बौद्ध लेण्याच्या तुलनेत असून या लेण्यामधून जैन धर्माची वैराग्य भावना दर्शवितात. या बरोबरच बारीक कोरीव काम व चित्रे ही या जैन लेण्यांची महती सांगतात. प्राचीन भारतात धर्मशाळा, लेणी, क्वचित मंदिरे सुद्धा मुख्यत्वे व्यापारी मार्गावर विश्रांतीसाठी उभारण्यात येत असत त्याचा उद्देश वाटसरुंना सुरक्षित आश्रय स्थान मिळावे असा असे. सोबतच त्यांना राजाश्रय, धर्माश्रय, लोकाश्रय प्राप्त असे ह्यासाठीच या लेण्याची निर्मिती केली असावी. वेरूळ लेण्याला भेट देण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात.

## वेरूळची लेणी

भारतातील महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद या जिल्ह्याच्या ठिकाणापासून २३ किलोमीटर अंतरावर वायव्य दिशेला, सह्याद्रीच्या रांगेतील सातमाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्वतरांगेत, दोन किलोमीटर परिसरात वेरूळ लेण्यांचा समूह विखुरलेला आहे. हैदराबादच्या निजाम राजवटीकडे या लेण्यांची मालकी जाईपर्यंत इंदूरच्या होळकरांनी या लेण्यांची काळजी घेतली होती. मात्र इ.स. १९५१ साली भारत सरकारने वेरूळ लेणी हे राष्ट्रीय स्मारक असल्याचे घोषित केले आणि त्यानंतर ती भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे सोपविण्यात आले.

एक युरोपियन प्रवासी कॅप्टन जॉन बेंजामिन सिली याने इ.स. १८१० मध्ये वेरूळ लेण्यांना भेट दिली होती. मुंबईहून पायी प्रवास करून तो वेरूळला पोहोचला होता. द वंडर्स ऑफ एलोरा या १८२५ मध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकात त्याने वेरूळ आणि आजूबाजूच्या परिसराची इत्थंभूत हकीकत लिहिलेली आहे.



वेरुळचे कैलास मंदिर

### बौद्ध लेणी

वेरूळची बौद्ध लेणी येथील सगळ्यात जुनी लेणी आहेत. ही लेणी मुख्यत्वे विहार रूपाची आहेत. काही विहारांतून पूजेसाठी मूर्तीही आहेत.

यांपैकी प्रसिद्ध लेणे म्हणजे विश्वकर्मा लेणे. अनेकमजली प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आपण स्तूपापाशी पोचतो. या स्तूपाच्या वरच्या भागातील दगड जणू लाकडी वासेच वाटावे असा कोरलेला आहे. या स्तूपात बुद्धाची धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेतील मूर्ती आहे.

### संदर्भ


1. रिपोर्ट ऑन दि एलुरा केव्ह टेम्पल्स, इ.स. १८७७, आर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया खंड ५ (इंग्लिश मजकूर, पी. डी. एफ.)
2. वर उडी मारा द वंडर्स ऑफ एलोरा, १८२५, जॉन बेंजामिन सिली (इंग्लिश मजकूर, इ बुक.)
3. स्पिंक, वॉल्टर एम. (डिसेंबर २००६). अजंता : हिस्ट्री ॲन्ड डेव्हलपमेंट, डिसेंबर २००६. आय.एस.बी.एन. 978-90-04-15644-9. २६ एप्रिल, २०१२ रोजी मिळवले. “Going down into the ravine where the caves were cut, he scratched his inscription (John Smith, 28th Cavalry, 28th April, 1819) across the innocent chest of a painted Buddha image on the thirteenth pillar on the right in Cave 10..”
4. De Bruyne, J.L. (1968) [1968]. *Rudrakavis Great Poem of the Dynasty of Rastraudha*. EJ Brill.
5. Chopra, P.N.; Ravindran, T.K.; Subrahmanian, N (2003) [2003]. History of South India (Ancient, Medieval and Modern) Part 1. New Delhi: Chand Publications. आई॰एॅस॰बी॰ऍन॰ 81-219-0153-7.
6. Dalby, Andrew (2004) [1998]. *Dictionary of Languages: The Definitive Reference to More Than 400 Languages*. New York: Columbia University Press. आई॰ऍस॰बी॰ऍन॰ 0-231-11569-5.